**शैक्षणिक वर्ष २०१९-२० :**
कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्व विद्यालय, रामटेक अंतर्गत नवीन महाविद्यालयांना मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक : मान्यता-२०१९/(१३२/१९)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १५ जून, २०१९

**संदर्भ:** शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/ (२२९/१७)/ मशि-४, दिनांक १२.१०.२०१७.

## शासन आदेश

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम, १९९७ आणि संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपूर या विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या निकषांप्रमाणे छाननी करण्यात आली. विद्यापीठाची शिफारस, शासनस्तरावर केलेली छाननीनुसार पात्र ठरलेल्या प्रस्तावांना कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम, १९९७ मधील कलम ६२(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार तसेच कलम ६२(५) परंतुकान्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार पुढील विवरणात नमूद केल्यानुसार नवीन महाविद्यालयांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून **कायम विना अनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्था / महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / अतिरिक्त तुकड्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | चंफा चॅरिटेबल ट्रस्ट व्हीनस पार्क संचलित पुंडलिक प्रशासकीय महाविद्यालय, राठीनगर, अमरावती | १. बी.ए. (सिव्हील सर्व्हिसेस)<br>२. एम.ए. पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन<br>३. बी. एस्सी हॉस्पिटॅलिटी स्टडिज<br>४. डिप्लोमा इन कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिजम्<br>५. पी. जी. डिप्लोमा इन कॉम्प्युटर कमर्शियल ॲप्लिकेशन (शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा) |
| २. | स्व. आबासाहेब खेडेकर शैक्षणिक संस्था, अकोला व्दारा मयुर देशमुख संचलित स्व. शोभाताई माधिकराव देशमुख महाविद्यालय, सुलतानपुर, पो. मुंडगांव, ता. आकोट, जि. अकोला. | १. बी.ए. सिव्हील सर्व्हिसेस (शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा) |
| ३. | आनंद मल्टीपर्पज सोसा. अकोला व्दारा- मयुर देशमुख संचलित युनाईटेड पब्लिक सर्व्हिस कॉलेज, राजूर, ता. मोताळा, जि. बुलढाणा | १. बी.ए. सिव्हील सर्व्हिसेस<br>२. डिप्लोमा इन लायब्ररी एण्ड इन्फॉर्मेशन सायन्स (शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा) |

२. अटी व शर्ती :-

१. नवीन महाविद्यालय/संस्थेने त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

२. महाविद्यालयाने/संस्थेने हमीपत्र सादर केल्याशिवाय आणि तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

३. महाविद्यालयांनी, संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक/कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी ३० ऑगस्ट पर्यंत करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

४. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

५. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज) रेग्युलेशन २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करु नये.

६. मंजूर करण्यात आलेल्या महाविद्यालयाने सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या कालमर्यादेत नॅक मुल्यांकन करुन घेण्यासाठी प्रयत्न करावा व याबाबत पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील.

३. विद्यापीठांनी संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करण्यापूर्वी शासन मान्यता आदेशांचे अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

४. संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या नवीन महाविद्यालयांचा नियतकालिक आढावा घेऊन सदर महाविद्यालयांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर महाविद्यालयांची मान्यता रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व

२४४८/२०१३ मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी सबंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६१५१२१६१०८८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray
Vasantrao kharke

(द.व. खारके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) कुलसचिव, कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्व विद्यालय, रामटेक.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
४) संबंधित संस्था (विद्यापीठामार्फत)
५) निवड नस्ती (मशि-४).

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय:,रामटेक (महाराष्ट्र)

रामटेक कार्यालय – प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक – 441106, जि.नागपूर

नागपूर कार्यालय – शैक्षणिक परिसर, पाचवा माळा, ना.सु.प्र. संकुल, मोरभवन जवळ, सीताबर्डी, नागपूर – 440012.

Website: http://kksanskrituni.digitaluniversity.ac | Email: collegesection@kksu.org

Ramtek: Ph. 07114-255747, Fax. 255549 | Nagpur: Ph. 0712-2542932, Fax No. 0712-2560992


पत्र क्र. ककासंवि/महाविद्यालयीन शाखा/2019/179 दिनांक: 31 JUL 201

प्रती,

मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,

चंपा चॅरिटेबल ट्रस्ट व्हीनस पार्क,

कांतानगर, अमरावती. पीन–444603

**विषय : कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालय सुरू करण्यास संलग्नीकरण परवानगी देण्याबाबत.**

संदर्भ : शासन आदेश क्रमाक: मान्यता – 2019/(132/19)मशि–4 दि. 15 जुन,2019

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये महाराष्ट्र शासनाने आपल्या चंपा चॅरिटेबल ट्रस्ट व्हीनस पार्क, कांतानगर, अमरावती. पीन–444603 द्वारे संचालीत **पुंडलिक प्रशासकिय महाविद्यालय, राठीनगर, अमरावती पीन–444603** या ठिकाणी सत्र 2019–20 या शैक्षणिक वर्षापासून कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम, 1997 मधील कलम 62(5) नुसार कायम विना अनुदान तत्वावर हे नवीन महाविद्यालय सुरू करण्यास खालील अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

**अटी**

1. सदर संस्थेने कायम विना अनुदान तत्वावर महाविद्यालय चालविण्यास तयार असल्याबाबतचे विनाअट हमीपत्र रू. 100/– च्या मुद्रांकपत्रावर संबंधित विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडून सादर करणे आवश्यक आहे. संस्था हमीपत्र देण्यास तयार नसल्यास तसे शासनास कळविण्यात येईल व शासनाचे आदेशानुसार विद्यापीठातर्फे कार्यवाही करण्यात येईल. संस्थेचे हमीपत्र मिळेपर्यंत महाविद्यालय सुरू करण्याची ही परवानगी लागू होणार नाही.

2. सदर महाविद्यालयास दिलेली मान्यता ही **कायम विना अनुदान तत्वावर** असून या महाविद्यालयास भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत शासनाकडून मागण्याचा अधिकार राहणार नाही व देण्यात येणार नाही.

3. या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतन व अन्य आर्थिक बाबींसंबंधीची संपूर्ण जबाबदारी शासकीय नियमानुसार स्वीकारणे संस्थेवर बंधनकारक आहे.

4. आरक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सवलतीबाबत शासनाचे वेळोवेळी जे नियम प्रचलित असतील ते सर्व संलग्नीत महाविद्यालयास लागू राहील.

5. संस्थेने मागणी केलेल्या अभ्यासक्रमासाठी विश्वविद्यालय अनुदान आयोगाने शासन निर्णय तसेच विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार अध्यापक कर्मचारी वर्ग आवश्यक असून इतर सर्व पायाभूत मुलभूत सुविधा महाविद्यालय सुरू करतांना उपलब्ध करून देणे संस्थेस अनिवार्य आहे. अन्यथा अभ्यासक्रम परवानगी रद्द केली जाईल.

6. या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने विहित केलेल्या पद्धतीचा अवलंब करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे संस्थेस बंधनकारक आहे.

7. मंजुर करण्यात आलेल्या महाविद्यालयाने नॅक मुल्यांकनासाठी पात्र ठरल्यानंतर एका वर्षात नॅक मुल्यांकन प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज करावा लागेल.

8. या अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्काचे दर विद्यापीठाने निर्धारित केले त्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व अन्य शुल्काची आकारणी करणे संस्थेला बंधनकारक आहे. या व्यतिरिक्त शुल्क आकारावयाचे असल्यास त्याची पूर्व परवानगी विश्वविद्यालयाकडून घेणे अपरिहार्य तसेच, या संदर्भात विद्यापीठाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील. विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्र किंवा नवीन गुणपत्रिका देताना विद्यार्थ्यांना पैशाची मागणी केल्याची तक्रार विश्वविद्यालयात आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाऊन अभ्यासक्रम खंडित करणे किंवा संलग्नीकरण काढून घेणे अशी कार्यवाही केली जाईल.

9. शिक्षकांची आणि प्राचार्यांची नियुक्ती ही विश्वविद्यालयाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अर्हतेनुसार आणि प्रकियेनुसारच करणे महाविद्यालयावर बंधनकारक आहे. अर्हताधारक शिक्षक व प्राचार्य महाविद्यालयाने न नेमल्यास किंवा ज्या महाविद्यालयात प्राचार्यांचे पद दोन महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त असेल त्या महाविद्यालयाची संलग्नता विश्वविद्यालय खंडित करेल याची नोंद घ्यावी.

10. अधिसूचनेनुसार संलग्नीकरण मान्यता मिळालेल्या पहिल्या वर्षाचे 1) बी.ए. सिव्हील सर्व्हिसेस. करिता रु. 40,000 +2500(प्रक्रीया शुल्क) 2)एम.ए. पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन करिता रु. 75,000 +2500(प्रक्रीया शुल्क) 3) बी.एस्सी हॉस्पिटीलिटि स्टडिज. करिता रु. 40,000 +2500(प्रक्रीया शुल्क)4) डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन एण्ड जर्नालिजम् रु. 20,000 +2500(प्रक्रीया शुल्क) 5) पी.जी. डिप्लोमा इन कम्प्युटर कमर्शियल ॲप्लिकेशन. करिता रु. 30,000 +2500(प्रक्रीया शुल्क) असे एकूण रू. 2,17,500/– विश्वविद्यालयात जमा केल्यावर वार्षिक संलग्नीकरण मान्य होईल. संलग्नीकरण शुल्क त्या–त्या वर्षाच्या परिवर्तनानुसार लागू राहील. संलग्नीकरण किंवा मान्यता पुढे चालू ठेवण्यासाठी अशा संलग्नीकरणाच्या किंवा मान्यतेच्या समाप्तीच्या तारखेपूर्वी सामान्यतः सहा महिने अगोदर अथवा विश्वविद्यालयाने विहित केलेल्या दिनांकापूर्वी संलग्नीकरण सातत्य शुल्क विश्वविद्यालयात जमा करावे.

11. विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रम संदर्भात वेळोवेळी होणारे बदल जाणून घेणे ही सर्वस्वी संस्थेची जबाबदारी राहील, याची संस्थेने आवर्जून नोंद घ्यावी.

12. विश्वविद्यालय आपल्या महाविद्यालयास वेळोवेळी ज्या अटी घालेल त्या सर्व अटी संस्थेला बंधनकारक राहतील.

13. विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क, नोंदणी शुल्क, शासकीय शुल्क आणि अन्य शुल्क ही विश्वविद्यालयात संस्थेनी निर्धारित वेळेच्या आत धनाकर्षाद्वारे जमा करणे बंधनकारक राहील. तसेच महाविद्यालयासाठी आवश्यक असलेले विविध आवेदनपत्रे विश्वविद्यालयातून खरेदी करून घेण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

14. संस्थेने मान्यताप्राप्त प्राचार्य यांच्या स्वाक्षरीनेच विश्वविद्यालयाशी पत्रव्यवहार करावा. प्राचार्यांची नेमणूक होईपर्यंत संस्थेच्या सचिव/अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने पत्रव्यवहार करावा. कोणत्याही बाबतीत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून विश्वविद्यालयाच्या कार्यालयाशी व्यवहार/संपर्क करू नये. तसे आढळल्यास विश्वविद्यालयाकडून त्याची गंभीर दखल घेण्यात येईल आणि परिणामांची पूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

15. महाविद्यालयाने विश्वविद्यालयाशी सर्व व्यवहार अधिकृत व्यक्तीच्या स्वाक्षरीने लेखी स्वरूपात करावा. मौखिक स्वरूपात किंवा दूरध्वनीद्वारे अधिकृत व्यवहार करू नये, कारण अशा व्यवहाराची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

16. अर्हताधारक प्राचार्य, शिक्षक, ग्रंथपाल इ. रिक्त पदांसाठी आवश्यक कार्यवाही, विश्वविद्यालयाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांनुसार करावी. जाहिरात दोन स्थानिक वृत्तपत्रांच्या सर्व आवृत्यात व एका राज्यस्तरीय वृत्तपत्राच्या सर्व आवृत्यातून प्रकाशित करावी लागेल.

17. जमीन/इमारतीच्या मालकी हक्काची कागदपत्रे व नकाशा सादर करणे आवश्यक आहे. इमारत भाडेपट्टीवर असल्यास किमान पाच वर्षाचा भाडे करारनामा असणे आवश्यक आहे.

18. विद्यार्थ्यांसाठी बसण्याकरिता पुरेसे फर्निचर तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह असणे तसेच वसतीगृहाची सुविधा असणे आवश्यक आहे.

19. सुसज्ज ग्रंथालय असणे तसेच ग्रंथालयात किमान 500 पुस्तके, स्टॉक बुक, ॲक्सेशन रजिस्टर व आलमाऱ्या असणे आवश्यक आहे.

20. विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, खेळाचे मैदान, खेळाचे साहित्य इत्यादी सोई असणे आवश्यक आहे.

21. महाविद्यालयात फॅक्स यंत्र, किमान दहा संगणक संच, दुरध्वनी, वेबसाईट, नोटीस बोर्ड असणे आवश्यक आहे.

22. मागील तीन वर्षांचा अंकेक्षण अहवाल, ऑडीटेड बॅलन्सशीट, इन्कम एक्सपेंडीचर स्टेटमेंट, संस्थेने मागील वर्षाचे आयकर (रिटर्न) भरल्याचे प्रमाणपत्र संस्थेकडे असणे आवश्यक आहे. विश्वविद्यालयाने मागणी करताच ते संस्थेला तातडीने सादर करावे लागेल.

23. प्रवेश सूचना जाहिरात, माहितीपत्रक, प्राचार्य व अधिव्याख्याता पदांची जाहिरात यास विश्वविद्यालयाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

24. संस्थेमध्ये सध्या सुरु असलेले विविध अभ्यासक्रम व उपक्रम विश्वविद्यालयाला कळविणे संस्थेला बंधनकारक आहे.

25. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तिका (Service Book) तयार करणे आवश्यक आहे.

26. विश्वविद्यालय अधिनियम 1997 मधील कलम 63(2) नुसार स्थानिय चौकशी समितीच्या अहवालानुसार व शासन आदेश अटी व शर्तीच्या अधीन राहुन आपल्या महाविद्यालयास खाली नमूद केल्याप्रमाणे 2019–20 या शैक्षणिक सत्राकरिता तदर्थ संलग्नीकरण (Adhoc Affiliation) देण्यात येत आहे.

27. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या विहित विद्यार्थी क्षमतेइतकेच प्रवेश देणे महाविद्यालयास बंधनकारक आहे. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देवू नये. अतिरिक्त जास्त प्रवेश करणाऱ्या महाविद्यालयाचे संलग्नीकरण कायम खंडित केले जाईल. महाविद्यालयांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या 50 टक्के किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास, महाविद्यालयाचे संलग्नीकरण खंडित करून शासन व विभागीय सहसंचालक यांना कळविण्यात येईल.

28. या अभ्यासक्रमास विद्यार्थी संख्या वाढविणे किंवा अतिरिक्त तुकडी सुरू करणे आवश्यक असल्यास कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम, 1997 मधील संबंधित तरतूदीनुसार विद्यापीठाकडे रितसर प्रस्ताव सादर करणे अनिवार्य आहे. परस्पर तुकडी/संख्या वाढविता येणार नाही.

| अ.क्र. | संस्थेचे नाव पत्ता | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | अभ्यासक्रम | तुकडी | प्रवेश क्षमता | संलग्नीकरणाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चंफा चॅरिटेबल ट्रस्ट क्वीनस पार्क,संचालीत कांतानगर, अमरावती. पीन–444603 | पुंडलिक प्रशासकिय महाविद्यालय, राठीनगर, अमरावती | 1) बी. ए. (सिव्हील सर्विसेस)<br>2) एम.ए. पब्लिक ऍडमिनिस्ट्रेशन<br>3) बी.एससी. इन्फोर्मेटिक्स स्टॅटिक्स<br>4) डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन एण्ड जर्नालिज्म<br>5) पी.जी. डिप्लोमा इन कम्प्युटर [illegible] अॅप्लिकेशन | 1<br>1<br>1<br>1<br>1 | 100<br>60<br>100<br>100<br>100 | 2019–20 |

29. महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमांना प्रवेश देतांना शासनाने व विश्वविद्यालयाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या नियमांच्या अधीन राहून विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये. असे प्रवेश विश्वविद्यालयाकडून अमान्य ठरतील. विश्वविद्यालयाने प्रवेश व नामांकनाकरिता विहीत केलेली पद्धती खालीलप्रमाणे आहे.

30. शासनाने मान्यता दिलेल्या वास्तु (ईमारत) व स्थळ (ठिकाण) या शिवाय अन्यत्र कुठेही अभ्यासक्रम(Course) चालु करता येणार नाही तसे हमीपत्र संस्थेने विश्वविद्यालयात सादर करावे.

31. विश्वविद्यालयाच्या व शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय संस्थेने महाविद्यालयाचे स्थलांतरण इतरत्र ठिकाणी करु नये तसेच विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय महाविद्यालय बंद करता येणार नाही व व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

32. महाविद्यालयाने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी विश्वविद्यालयाच्या मागासवर्गीय कक्षाकडुन बिंदुनामावली (रोस्टर) प्रमाणित करुन घेणे अनिवार्य आहे.

33. प्रवेश पद्धती :–

1. प्रवेशाकरिता प्रवेश सूचना जाहीरात कमीत कमी दोन स्थानिक व एका राष्ट्रीय वृत्तपत्रामध्ये देऊन पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाकरिता अर्ज मागविण्यात यावे.
2. संबंधीत वर्षाच्या अभ्यासक्रमिकेत नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यालाच प्रवेश देण्यात यावा. या अर्हतेत विश्वविद्यालयाने परिपत्रकाद्वारे काही परिवर्तन केले असल्यास त्या परिवर्तित

अर्हतेनुसार छात्र प्रवेश करावेत. अर्हता परिवर्तित आहे काय याची माहिती विश्वविद्यालयाकडून प्रवेश प्रक्रियेपूर्वी घेण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

3. प्रवेश करताना पात्रता परीक्षेच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करून गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावेत.

4. प्रवेशासंबंधात शासनाने व विश्वविद्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

5. प्रवेश संपल्यापासून 10 दिवसात प्राचार्यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची संपूर्ण यादी विश्वविद्यालयास सादर करावी. विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे.

6. विद्यार्थी प्रवेश सूची विश्वविद्यालयाकडून मान्य होईपर्यंत सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयाने प्रोव्हिजनल (तात्पूरते) स्वरूपात ठेवावेत. विश्वविद्यालयाच्या मान्यता मिळाल्यानंतरच प्रवेश निश्चित करावेत. विश्वविद्यालयाच्या अनुमतीशिवाय प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षेची जबाबदारी विश्वविद्यालयाकडे राहणार नाही याची आवर्जून नोंद घ्यावी.

34.नामांकन पद्धती :–

1. पदवी, पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदन पत्र विश्वविद्यालयाने विहित केलेल्या प्रपत्रामध्ये विहित मुदतीत विश्वविद्यालयास महाविद्यालयामार्फत जमा करणे आवश्यक आहे.

2. सदर आवेदन पत्र विश्वविद्यालयास सादर करतांना विद्यार्थी अभ्यासक्रमाकरिता आवश्यक असणारी पात्रता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे व प्रमाणपत्राची तपासणी केल्याबद्दलचे प्रमाणपत्र प्राचार्यांनी देणे आवश्यक आहे.

3. पात्रता परीक्षा उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांचे नामांकन करण्यात येईल.

4. नामांकन आवेदन पत्रासोबत सर्व मूळ आवश्यक दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे.

5. महाविद्यालयाकडून आवेदन पत्र विहित मुदतीपर्यंत प्राप्त न झाल्यास अथवा इतर कुठल्याही कारणाने विद्यार्थ्यांचे नामांकन होऊ न शकल्यास त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होईल व त्या विद्यार्थ्यास परीक्षेला प्रवेशित करून घेतले जाणार नाही.

35. विश्वविद्यालयाचे वेळोवेळी प्रकाशित होणारे अध्यादेश, परिनियम, नियम व परिपत्रकांचे संस्थानी / महाविद्यालयांनी काटेकोरपणे पालन करावे. तसेच कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम, 1997 मधील कलम 61 नुसार संस्थेचे हमीपत्र तात्काळ विश्वविद्यालयास पाठवावे. सदर हमीपत्र "संलग्नीकरणाच्या अटी संबंधीचे पत्र आम्ही वाचले असून आम्हाला सर्व अटी मान्य आहेत. आम्ही सर्व अटींचे कसोशीने व जबाबदारीने पालन करू. जर आम्ही कोणत्याही अटींचे उल्लंघन केले तर विश्वविद्यालयाची, संस्थेचे संलग्नीकरण खंडीत करण्याची प्रक्रिया आम्हाला मान्य राहील." असे प्रतिज्ञापत्र रू 500/– च्या मुद्रांकावर विश्वविद्यालयाकडे सादर करावे.

36. सदर महाविद्यालयाला विद्यार्थ्यांसाठी **कौशल्य विकास कार्यक्रम** राबवावा लागेल हे महाविद्यालयास बंधनकारक असून याचा अहवाल विश्वविद्यालयाच्या NSQF Online वर अहवाल सादर करावा.

37. विश्वविद्यालयात राबविल्या जाणारे संस्कृत विषयक अभ्यासक्रम (Diploma/Certificate) महाविद्यालयद्वारे राबवणे बंधनकारक राहील. याचा अहवाल दोन महिन्यात विश्वविद्यालयास सादर करावा.

भवदीय,

(डॉ. दिपक मेश्राम)
उपकुलसचिव,
महाविद्यालयीन विभाग
क.का.संस्कृत विश्वविद्यालय,
रामटेक

प्रतिलिपी –

1) मा. संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे – 1.
2) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग . अमरावती.
3) परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
4) वित्त व लेखा अधिकारी, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
5) उपकुलसचिव (विद्या विभाग), कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.

College com. 6


कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

रामटेक कार्यालय : प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक, जि.नागपूर – 441 106

वारंगा कार्यालय : पाचवा मजला, नासुप्र संकुल, मोर भवन जवळ, सीताबर्डी, नागपूर–440 012

KAVIKULAGURU KALIDAS SANSKRIT UNIVERSITY, RAMTEK

Ramtek Office – Administrative Building, Mauda Road, Ramtek, Dist. Nagpur – 441 106

Waranga Office - 5th Floor, NIT Complex, Near Mor Bhavan, Sitabuldi, Nagpur – 440 012

Accredited with Grade "B++" by NAAC

Ramtek Office Ph.No.-07114-256476, 255747
Waranga Office Ph.No.-0712-2560992, 2542932

Website: kksanskrituni.digitaluniversity.ac, www.kksu.org
E-mail : collegesection@kksu.org


पत्र क्र.ककासंवि/महा. विभाग/२०२१/८२५

दि. २१.०९.२०२१

# संलग्नीकरण सातत्य प्रमाणपत्र
## शैक्षणिक सत्र २०२१–२२

प्रमाणित करण्यात येते की, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम १९९७ च्या कलम ६६ अन्वये चंफा चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती या संस्थेच्या **पुंडलिक प्रशासकिय महाविद्यालय, राठीनगर, अमरावती (कॉलेज कोड–११३१)** येथे सुरू असलेल्या खालील अभ्यासक्रमाचे शैक्षणिक सत्र २०२१–२२ करीता संलग्नीकरण सातत्य सुरू ठेवण्यास व विद्यार्थी प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

# Affiliation Continuation Certificate
## Academic Year 2021-22

This is to certify that as per provisions in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Act 1997 under section no. 66, Champha Charitable Trust, Amravati society's **Pundalik Prashasakiya Mahavidyalay, Amravati (College code-1131)** is hereby granted Affiliation Continuation for the Academic Year 2021-22, for admissions for following program.

| Sr. No. | Name of the Program | Intake Capacity | Year of continuation of Affiliation |
|---|---|---|---|
| 1 | B.A. (Civil Services) | 120 | Academic Year 2021-22 |
| 2 | M.A. (Public Administration) | 75 | Academic Year 2021-22 |
| 3 | B.Sc. (Hospitality Studies) | 100 | Academic Year 2021-22 |
| 4 | Diploma in Mass Communication and Journalism | 100 | Academic Year 2021-22 |
| 5 | B.Com | 120 | Academic Year 2021-22 |
| 6 | Post Graduate Diploma in Computer Application (PGDCA) | 100 | Academic Year 2021-22 |

**Sumit M. Kathale**
**Assistant Registrar**
**College Section**

Copy to: - Controller of Examination, K. K. Sanskrit University, Ramtek

College com. 6


# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

रामटेक कार्यालय : प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक, जि.नागपूर – 441 106.

वारंगा कार्यालय : पाचवा मजला, नासुप्र संकुल, मोर भवन जवळ, सीताबर्डी, नागपूर–440 012

**KAVIKULAGURU KALIDAS SANSKRIT UNIVERSITY, RAMTEK**

Ramtek Office – Administrative Building, Mauda Road, Ramtek, Dist. Nagpur – 441 106

Waranga Office - 5th Floor, NIT Complex, Near Mor Bhavan, Sitabuldi, Nagpur – 440 012

**Accredited with Grade "A+" by NAAC**

Ramtek Office Ph.No.-07114-256476, 255747
Waranga Office Ph.No.-0712-2560992, 2542932

Website:kksanskrituni.digitaluniversity.ac,www.kksu.org
E-mail : collegesection@kksu.org


दि. १३.०८.२०२२

पत्र क्र. ककसंवि/महा.विभाग/२०२२/५७७–९

## संलग्नीकरण सातत्य प्रमाणपत्र
## शैक्षणिक सत्र २०२२–२३

प्रमाणित करण्यात येते की, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम १९९७ च्या कलम ६६ अन्वये चंफा चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती या संस्थेच्या **पुंडलिक प्रशासकिय महाविद्यालय, अमरावती (कॉलेज कोड–११३१)** येथे सुरू असलेल्या खालील अभ्यासक्रमाचे शैक्षणिक सत्र २०२२–२३ करीता संलग्नीकरण सातत्य सुरू ठेवण्यास व विद्यार्थी प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

## Affiliation Continuation Certificate
## Academic Year 2022-23

This is to certify that as per provisions in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Act 1997 under section no. 66, Champha Charitable Trust, Amravati society's **Pundalik Prashasakiya Mahavidyalay, Amravati (College code-1131)** is hereby Granted Affiliation Continuation for the Academic Year 2022-23, for admissions for following program.

| Sr. No. | Name of the Program | Intake Capacity | Year of continuation of Affiliation |
|---|---|---|---|
| 1 | B.A. (Civil Services) Batch-1 | 120 | Academic Year 2022-23 |
| 2 | B.A. (Civil Services) Batch-2 | 120 | Academic Year 2022-23 |
| 3 | M.A. (Public Administration) | 75 | Academic Year 2022-23 |
| 4 | B.Sc. (Hospitality Studies) | 100 | Academic Year 2022-23 |
| 5 | Diploma in Mass Communication and Journalism | 100 | Academic Year 2022-23 |
| 6 | B.Com Batch-1 | 120 | Academic Year 2022-23 |
| 7 | B.Com Batch-2 | 120 | Academic Year 2022-23 |
| 8 | Post Graduate Diploma in Computer Application (PGDCA) | 100 | Academic Year 2022-23 |

**(Dr. Ramchandra J. Joshi)**
**Registrar**

Copy to: - Controller of Examination, K. K. Sanskrit University, Ramtek.

College com. 6


कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
रामटेक कार्यालय : प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक, जि.नागपूर– 441 106,
वारंगा कार्यालय : पाचवा मजला, नासुप्र संकुल, मोरभवन जवळ, सीताबर्डी, नागपूर–440 012

KAVIKULAGURU KALIDAS SANSKRIT UNIVERSITY, RAMTEK
Ramtek Office – Administrative Building, Mauda Road, Ramtek, Dist. Nagpur – 441 106
Waranga Office - 5th Floor, NIT Complex, Near MorBhavan, Sitabuldi, Nagpur – 440 012
Accredited with Grade "A+" by NAAC

Ramtek Office Ph.No.-07114-256476, 255747
Waranga Office Ph.No.-0712-2560992, 2542932
Website: kksanskrituni.digitaluniversity.ac, www.kksu.org
Email – collegesection@kksu.org


पत्र क्र. ककासंवि/महा.विभाग/F-३९/२०२३/९१–८ दिनांक : १६.०३.२०२३

# संलग्नीकरण सातत्य प्रमाणपत्र
# शैक्षणिक सत्र २०२३–२४

प्रमाणित करण्यात येते की, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम १९९७ च्या कलम ६६ अन्वये चंफा चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती या संस्थेच्या **पुंडलिक प्रशासकिय महाविद्यालय, अमरावती (कॉलेज कोड–११३१)** येथे सुरू असलेल्या खालील अभ्यासक्रमाचे शैक्षणिक सत्र २०२३–२४ करीता संलग्नीकरण सातत्य सुरू ठेवण्यास व विद्यार्थी प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

# Affiliation Continuation Certificate
# Academic Year 2023-24

This is to certify that as per provisions in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Act 1997 under section no. 66, Champha Charitable Trust, Amravati society's **Pundalik Prashasakiya Mahavidyalay, Amravati (College code-1131)** is hereby Granted Affiliation Continuation for the Academic Year 2023-24, for admissions for following program.

| Sr. No. | Name of the Program | Intake Capacity | Year of continuation of Affiliation |
|---|---|---|---|
| 1 | B. A. (Civil Services) Batch-1 | 120 | Academic Year 2023-24 |
| 2 | B. A. (Civil Services) Batch-2 | 120 | Academic Year 2023-24 |
| 3 | M. A. (Public Administration) | 75 | Academic Year 2023-24 |
| 4 | B. Sc. (Hospitality Studies) | 100 | Academic Year 2023-24 |
| 5 | Diploma in Mass Communication and Journalism | 100 | Academic Year 2023-24 |
| 6 | B. Com Batch-1 | 120 | Academic Year 2023-24 |
| 7 | B. Com Batch-2 | 120 | Academic Year 2023-24 |

College com. 6

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | Post Graduate Diploma in Computer Application (PGDCA) | 100 | Academic Year 2023-24 |

**(Dr. Ramchandra J. Joshi)**
**Registrar**

Copy to: - Controller of Examination, K. K. Sanskrit University, Ramtek.